# कचऱ्यावरून कविता भोंगाळे संतापल्या; प्रशासनाला खडसावले!

## प्रभाग ५ मधील अस्वच्छता अन् डेंग्यूच्या प्रश्नावर सभागृहात जाब

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या सर्वसाधारण सभेत प्रभाग क्रमांक ५ मधील कचरा संकलन आणि डेंग्यूच्या प्रश्नावर नगरसेविका कविता भोंगाळे यांनी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. कचरा संकलन व्यवस्थेतील त्रुटी, नागरिकांना होणारा त्रास आणि परिसरातील वाढत्या डासांच्या समस्येकडे त्यांनी सभागृहाचे लक्ष वेधले.**



“प्रभाग क्रमांक ५ मध्ये कचरा संकलनाची व्यवस्था कोलमडली असून, नागरिकांना अस्वच्छता आणि डेंग्यूच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. धार्मिक स्थळे व पालखी मार्गालगत कचरा डंपिंगची जागा निश्चित करण्यापूर्वी स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेणे गरजेचे आहे. प्रशासनाने केवळ कागदोपत्री कार्यवाही न करता प्रत्यक्ष पाहणी करून तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात.”

- **कविता भोंगाळे, नगरसेविका, भाजपा.**

क्षेत्रीय कार्यालयाकडून तात्पुरते कचरा डंपिंगचे ठिकाण म्हणून संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर आणि संत ज्ञानेश्वर महाराज नगर परिसरातील जागा सांगण्यात आली आहे. मात्र, अशा महत्त्वाच्या ठिकाणी कचरा डंपिंगची जागा निश्चित करताना स्थानिक नगरसेवकांना विश्वासात घेतले गेले नाही, असा आक्षेप भोंगाळे यांनी नोंदविला.

कचरा साठविण्यासाठी योग्य नियोजन नसल्याने परिसरात अस्वच्छता निर्माण होत असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. कचरा संकलनाची व्यवस्था सुरळीत करण्याबरोबरच डेंग्यूच्या वाढत्या प्रादुर्भावावर तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

दरम्यान, धार्मिक स्थळे आणि पालखी मार्गालगत कचरा डंपिंगची जागा करणे योग्य आहे का?, असा सवाल उपस्थित करत भोंगाळे यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून केवळ कागदोपत्री कार्यवाही न करता प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करून ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

### डेंग्यूच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाला जाब

सभागृहात डेंग्यूच्या प्रश्नावरही भोंगाळे यांनी आक्रमक भूमिका घेतली. नागरिकांच्या तक्रारी घेऊन येणाऱ्या लोकप्रतिनिधींना प्रशासनाकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी फवारणी, स्वच्छता आणि पाणी साचणाऱ्या ठिकाणांवर प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी केली. कचरा संकलन व्यवस्था आणि आरोग्यविषयक उपाययोजना यामध्ये समन्वयाचा अभाव राहिल्यास नागरिकांना त्याचा थेट फटका बसतो. त्यामुळे प्रभागातील कचरा व्यवस्थापन आणि डेंग्यू प्रतिबंधक उपाययोजनांबाबत प्रशासनाने तातडीने कृती आराखडा तयार करावा, अशी मागणी कविता भोंगाळे यांनी केली. सभागृहात मांडलेल्या या प्रश्नांमुळे प्रभाग क्रमांक ५ मधील कचरा व्यवस्थापन, स्वच्छता आणि नागरिकांच्या आरोग्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# खासगी शाळांच्या भरमसाठ फीवर रिटा सानप आक्रमक!



**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी तयार करण्यात येत असलेल्या STANDARD OPERATING PROCEDURE (SOP) मध्ये विद्यार्थ्यांच्या हिताचे आणि पालकांवरील आर्थिक भार कमी करणारे महत्त्वाचे मुद्दे समाविष्ट करावेत, अशी मागणी भाजप नगरसेविका रिटा सानप यांनी महापालिका सर्वसाधारण सभेत केली.**

खासगी शिक्षण संस्थांच्या फीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून, त्यासोबत विविध ॲक्टिव्हिटी, इतर शुल्क आणि शैक्षणिक खर्चामुळे सामान्य नागरिकांवर आर्थिक भार पडत आहे. त्यामुळे या वाढत्या शुल्कावर नियंत्रण ठेवण्यासाठी SOP मध्ये ठोस तरतूद करण्यात येणार आहे का, असा सवाल सानप यांनी उपस्थित केला.

तसेच, महापालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी आरक्षित असलेले भूखंड खासगी शिक्षण संस्थांना देण्यात आले आहेत किंवा भविष्यात देण्यात येणार आहेत. अशा शाळांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरीब कुटुंबातील मुलांसाठी किमान २० टक्के जागा महापालिकेच्या वतीने राखीव ठेवण्यात याव्यात, अशी महत्त्वाची मागणी त्यांनी केली.

या राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया लकी ड्रॉ पद्धतीने पारदर्शकपणे राबविण्यात यावी, अशीही त्यांनी सूचना केली. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल तसेच सामान्य कुटुंबातील गुणवंत विद्यार्थ्यांना चांगल्या खासगी शाळांमध्ये मोफत किंवा सुलभ पद्धतीने शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होऊ शकते, असे सानप यांनी नमूद केले.

महापालिका शाळांसाठी SOP तयार करताना विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित, पालकांवरील आर्थिक भार आणि सामाजिक समता यांचा गांभीर्याने विचार करून या सर्व मुद्द्यांचा समावेश करावा, अशी विनंती त्यांनी महापौर आणि महापालिका आयुक्तांकडे केली.

### खासगी शाळांच्या फीवर नियंत्रणाची गरज

खासगी शाळांच्या वाढत्या शुल्कामुळे सामान्य पालकांवर आर्थिक भार वाढत आहे. त्यामुळे महापालिकेच्या SOP मध्ये फी नियंत्रणासाठी ठोस तरतुदी कराव्यात. तसेच महापालिकेच्या भूखंडांवर उभारलेल्या खासगी शाळांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी २० टक्के जागा राखीव ठेवून, या जागांसाठी लकी ड्रॉद्वारे पारदर्शक प्रवेश प्रक्रिया राबवावी, अशी मागणी नगरसेविका रिटा सानप यांनी केली.

### पालकांचा आर्थिक भार कमी करा

खासगी शाळांच्या वाढत्या फीमुळे पालकांवरील आर्थिक ताण वाढत आहे. त्यामुळे शुल्कवाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी SOP मध्ये स्पष्ट आणि कठोर नियमांचा समावेश करावा, अशी मागणी रिटा सानप यांनी केली.

### SOP मध्ये ठोस नियमांची गरज

महापालिका क्षेत्रातील शाळांसाठी तयार होणाऱ्या SOP मध्ये केवळ प्रशासकीय बाबी न ठेवता विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित, शुल्क नियंत्रण आणि सामाजिक समतेला प्राधान्य द्यावे, अशी भूमिका रिटा सानप यांनी मांडली.

### गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी

महापालिकेच्या भूखंडांवर उभारलेल्या खासगी शाळांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी किमान २० टक्के जागा राखीव ठेवाव्यात. या जागांवरील प्रवेश लकी ड्रॉद्वारे पारदर्शकपणे करावा, अशी सूचना करण्यात आली.